International Journal for Multidisciplinary Research
International Conference on Multidisciplinary Research & Studies 2023
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com
ICMRS'23

# PMJJBY आणि PMSBY चे विश्लेषणात्मक अध्ययन

**प्रा. डॉ. जया एस. सवाईथूल**

सहयोगी प्राध्यापक (वाणिज्य विभाग), श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावती

**सारांश : भौगोलिक, सामाजिक, सांस्कृतिक विविधतेत भारत देशवेगळाआहे. गेल्या दोन दशकांपासून, भारतातील सेवा क्षेत्र-प्रामुख्याने माहिती तंत्रज्ञान, दळणवळण, पर्यटन, विमा, बँकिंग इत्यादी, सार्वत्रिक आकर्षणाचे केंद्र म्हणून उदयास आलेआहे. यांचे भारताच्या जीडीपीत 53 टक्के योगदान आहे. विमा उद्योगामध्ये तोटा कमी करण्याची, आर्थिक स्थैर्य आणण्याची आणि अर्थव्यवस्थेत व्यापार आणि व्यवसायाला चालना देण्याची क्षमता आहे. प्रधान मंत्री जन धन योजनेच्या (PMJDY) यशानंतर, भारत सरकारने सर्व भारतीयांसाठी प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना (PMJJBY) आणि प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना (PMSBY) या दोन रचनात्मक मुदत विमा योजना सुरू केल्या. या योजना "जन धन से जन सुरक्षा" - आर्थिक समावेशाद्वारे सामाजिक सुरक्षा व्यवस्था - या बोधवाक्यातून प्रक्षेपित करण्यात आल्या. न्यू इंडिया फ्लॅगशिप अंतर्गत, सरकार नाविन्यपूर्ण, सोप्या, कमी प्रीमियम आणि ग्राहक-केंद्रित दृष्टीकोनातून देशाच्या विमा क्षेत्राला मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहन देत आहे. परिणामी, विमा आता केवळ उच्चभ्रू किंवा उच्च उत्पन्न असलेल्या लोकांपुरता मर्यादित राहिलेला नाही. प्रस्तूत शोधनिबंधात PMJJBY & PMSBY च्या विश्लेषणात्मक संशोधनाद्वारे विमा उद्योगाची वर्तमान स्थिती जाणून घेण्याचा प्रयत्नकरण्यात आला आहे.**

**मुख्य शब्द: प्रधान मंत्री जन धन योजना, प्रधान मंत्री जीवन ज्योती विमा योजना, प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना**

## प्रस्तावना

आज प्रत्येकजण उदरनिर्वाहासाठी काही ना काही कामधंदा, नोकरी, व्यापार, उद्योग अथवा व्यवसाय करीत आहे. यामध्ये व्यक्ती आणि संपत्तीला अनपेक्षित संकटामुळे केव्हा काय होईल याचा अंदाज करता येत नाही. अर्थात असे असले तरी होणाऱ्या नुकसानीची भरपाई करण्याचा मार्ग मानवाने शोधला असून तो मार्ग म्हणजेच विमा होय. विमा हा एक सामाजिक सहकार्याचा उत्कृष्ट अविष्कार आहे. मानवी जीवनातील धोके आपण टाळू शकत नाही. परंतु धोक्यामुळे होणारे नुकसान कमीत कमी राखण्याची व हानीच्या भरपाईची व्यवस्था करता येते. ही व्यवस्था म्हणजेच विमा होय. विम्याच्या सहाय्याने नुकसान अनेक व्यक्तींच्यामध्ये विभागले जाते. परिणामी नुकसानीची तीव्रता कमी होते.

विमा संरक्षण आणि घनता हे असे दोन निकष आहेतज्याचा उपयोग कोणत्याही देशातील विमा क्षेत्राच्या विकासासाठी केला जाऊ शकतो. जीडीपीच्या तुलनेत विमा संरक्षण मोजले जाते.हे विमा प्रीमियमच्या टक्केवारीच्या रूपात केले जाते,तर विम्याची घनता एकूण लोकसंख्येच्या तुलनेत प्रीमियमच्या प्रमाणानुसार (प्रति प्रीमियम) मोजली जाते.2001-02 मध्ये जीवन विमा संरक्षण 2.15 टक्के होते ते 2020-21 मध्ये 3.20 टक्क्यांवर पोचले; देशातील गैर-जीवन विमा क्षेत्राचे संरक्षण 2001-02 मध्ये 0.56 टक्के होते ते 2020-21 मध्ये 1.00 टक्क्यांवर पोचले. सध्या भारतात 67 विमा कंपन्या कार्यरत आहेत.

**तक्ता – 1 भारतातील नोंदणीकृत विमा कंपन्यांची यादी**

| विमा कंपनीचा प्रकार | सार्वजनिक क्षेत्र | खाजगी क्षेत्र | एकूण |
|---|---|---|---|
| जीवन | 01 | 23 | 24 |
| सामान्य | 06 | 21 | 27 |
| आरोग्य | 00 | 05 | 05 |
| पुनर्विमाधारक (विदेशी पुनर्विमादारांसह लॉयड्स इंडिया) | 01 | 10 | 11 |
| **एकूण** | **08** | **59** | **67** |

**स्रोत: IRDAIवार्षिक अहवाल 2020-21**

प्रधानमंत्री जन धन योजना (PMJDY),ही भारताची एक आर्थिक क्षेत्राची वित्तीय समावेशन योजना आहे. याचे विमोचन पंतप्रधान नरेंद्र मोदीद्वारे २८ ऑगस्ट २०१४ला करण्यात आले. या योजनेत उद्घाटनाच्याच दिवशी १.५ करोड खाती उघडण्यात आलीत.PMJDY च्या अत्यंत प्रशंसनीय यशानंतर, भारत सरकारने, लोकसंख्येच्या कमी उत्पन्न असलेल्या भागांमध्ये विमा प्रवेश सुलभ करण्यासाठी, प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना (PMJJBY) आणि प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना (PMSBY) या दोन रचनात्मक मुदत विमा योजना सुरू केल्या. याचे विमोचन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचेद्वारे09 मे 2015 रोजी कोलकाता येथून "जन धन से जन सुरक्षा"-आर्थिक समावेशाद्वारे सामाजिक समावेश या ब्रीदवाक्याने करण्यात आले.

**अभ्यासाची उद्दिष्टे**

- PMJJBY आणि PMSBY विम्याची भूमिका निश्चित करणे.
- PMJJBY आणि PMSBY च्या सध्याच्या कामगिरीचे विश्लेषण करणे.
- PMJJBY आणि PMSBY ची गुणात्मक आव्हाने समजून घेणे.
- आगामी वर्षांमध्ये PMJJBY आणि PMSBY च्या क्षमतांचा शोध घेणे.

**संशोधन पद्धती –**

प्रस्तूत शोधनिबंधात दुय्यम स्त्रोतांचा उपयोग करण्यात आला आहे. दुय्यम स्त्रोतांकरिता सरकारी प्रकाशने, IRDAIचे वार्षिक अहवाल, वेबसाइट इ. चा वापर करण्यात आला आहे.

**प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना (PMJJBY)-**

प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना (PMJJBY) ही गरीब आणि आर्थिक उत्पन्न कमी असणऱ्यांसाठी केंद्र सरकारने सुरू केलेली जीवन विमा योजना आहे. ही योजना २०१५ मध्ये सुरु करण्यात आली. ही एक मुदत विमा योजना आहे. ह्या योजनेमध्ये 2 लाख रुपये जीवन संरक्षण (लाईफ कव्हर) मिळते.त्यासाठी विमाधारकास प्रत्येक वर्षी हप्त्याची रक्कम भरावी लागते. विमाधारकाच्या बँक खात्यात पुरेशी रक्कम असल्यास त्याच्या खात्यातून विम्याची रक्कम ऑटो डेबिट (स्वयं-डेबिट) केली जाते. ज्यावेळी विमाधारकाचा मृत्यू होईल त्यावेळी विमाधारकाच्या कुटुंबाला 2 लाख रुपये मिळतात.

**पात्रता –**

- ज्यांचे वय १८ ते ५० वर्षे पर्यंत आहे. ते लोक ह्या योजनेसाठी पात्र आहेत.
- योजनेसाठी बँकेत आपले सेविंग खाते असणे आणि त्या खात्याला आधार लिंक असणे गरजेचे असते.

**अर्ज करण्याची प्रक्रिया–**

ज्यांना प्रधानमंत्री जीवन ज्योति विमा योजनेचा लाभ घ्यायचा असेल त्यांनाइंटरनेट बँकिंग आणि मोबाईल बँकिंगचा वापर करून ऑनलाईन पद्धतीने सुद्धा अर्ज करता येतोकिंवा आपण आपल्या बँकेत जाऊन अर्ज करू शकतो. तसेच ह्या योजनेचा अर्ज (PMJJBY PDF Form) ह्या लिंक वर क्लिक करून डाऊनलोड करू शकतो.

**आवश्यक कागदपत्रे –**

- अर्जदाराचे आधार कार्ड
- बँक अकाउंट पासबुक (बँक अकाउंट आधार लिंक असणे महत्त्वाचे)
- मोबाईल नंबर
- पासपोर्ट साईज फोटो

**कालावधी-**

ह्या विम्याचा कालावधी १ जून ते ३१ मे पर्यंत एक वर्षाचा असतो. परंतु दरवर्षी ह्या विम्याचे आपोआप नुतनीकरण होत असते. त्यासाठी आपल्या खात्यामध्ये विम्याच्या हप्त्यापुरती शिल्लक रक्कम ठेवावी लागते.त्यानंतर दरवर्षी आपल्या खात्यातून हप्त्याची रक्कम आपोआप वजा होते, म्हणजेच ऑटो डेबिट होऊन आपला विमा पुढील एका वर्षासाठी वाढवला जातो.

**हफ्ता (Premium) –**

या योजनेचा वार्षिक हफ्ता हा (पूर्वी 330) आता 1.06.2022 पासून ४३६ रुपये असून अर्ज केल्यानंतर तो आपल्या खात्यातून वजा केला जातो. ही सेवा वय १८ ते ५० वर्षामधील लोकांसाठी असते. ४३६ ही हफ्ताची रक्कम दरवर्षी मे महिन्यामध्ये आपोआप (Auto Debit) म्हणजे आपल्या खात्यातून कमी केली जाते. त्यामुळे मे महिन्यामध्ये आपल्याला आपल्या खात्यामध्ये हप्त्याची रक्कम शिल्लक ठेवावी लागते.जर रक्कम शिल्लक नसेल तर आपला विमा आपोआप बंद होतो.

**नुतनीकरण (Renewal)–**

आपल्या खात्यामधून मे महिन्यामध्ये आपल्या हप्त्याची रक्कम ४३६ रुपये डेबिट किंवा कमी झाले असतील तर आपल्या विम्याचे आपोआप नुतनीकरण (Renew) केले जाते.जर आपल्या खात्यामध्ये हप्त्याची रक्कम ४३६ रुपये शिल्लक नसेल तर आपला विमा बंद होतो.त्यानंतर जर आपल्याला विमा चालू ठेवायचा असेल तर त्यासाठी पुन्हा नवीन फॉर्म भरून द्यावा लागतो.

**फायदे(Benefits)**

- विमाधारकाचा कोणत्याही प्रकारे (नैसगिक किंवा अपघाती) मृत्यू झाल्यास वारसदाराला किंवा कुटुंबाला २ लाख रुपयांची आर्थिक मदत मिळते.
- योजनेत सहभागी झालेल्या त्या व्यक्तीचे वय 18 ते 55वर्षे असेल (त्यापेक्षा जास्त नाही) आणि कोणत्याही कारणाने मृत्यू झाला असेल तरच त्या व्यक्तीच्या वारसास 2,00,000 रुपये रक्कम मिळेल. म्हणजेच ही योजना वयाच्या 55 व्या वर्षापर्यंत विमा कव्हर देते.
- ही योजना मुदत विमा योजना असल्यामुळे मॅच्युरिटी बेनिफिट, सरेंडर व्हॅल्यू अश्या गोष्टीचा लाभ ह्यामध्ये होत नाही.

**कवर समाप्ती (Termination of Cover) –**

- विमाधारकाचे वय ५५ वर्षे पूर्ण झाल्यानंतर विम्याचे कवर समाप्त होते.
- योजनेला लिंक असलेले बँकेतील खाते बंद झालेच किंवा बंद केले गेले असेल तर विम्याचे कवर समाप्त होते.

- मे महिन्यात खात्यामध्ये हप्त्याची रक्कम शिल्लक नसेल तर विम्याचे कवर समाप्त होते.
- जर एकापेक्षा जास्त बँकेमध्ये खाते असेल आणि एकापेक्षा जास्त ठिकाणी सदर विम्याचा अर्ज केला असेल तरीही आपणास विम्याचे कवच फक्त एकाच खात्याला मिळते.

**दावा (क्लेम) कसा करावा–**

- विमाधारकाच्या निधनानंतर लाभार्थ्याने ज्या बँकेचे बचत खाते योजनेशी जोडलेले आहे त्या बँकेला भेट द्यावी. येथे वारसदाराने वेबसाइटवरून डाउनलोड केलेल्या PMJJBY क्लेम फॉर्मसह विमाधारकाचे मृत्यूप्रमाणपत्र (मृत्यूचा दाखला) देणे आवश्यक असते.
- हा क्लेम फॉर्म लाभार्थी बँकेकडून किंवा विमा कंपनीकडून सुद्धा घेवू शकतो.
- विमाधारकाचे मृत्यू प्रमाणपत्र, बँक खात्याचे तपशील, डिस्चार्ज पावती, कॅन्सल चेक आणि नॉमिनीचे बँक तपशील यासारख्या आवश्यक कागदपत्रांसह आपला फॉर्म बँकेत किंवा विमा कंपनीत सबमिट करावा.
- त्यानंतर बँकेने आपली आवश्यक ती कागदपत्रे आणि दावा (क्लेम) फॉर्मची पडताळणी केल्यानंतर, विम्याची रक्कम लाभार्थीच्या बँक खात्यात स्थानांतरित केली जाते.

**आधिक माहिती–**

आपल्याला कोणतीही अडचण असेल तर अधिक माहितीसाठी www.jansuraksha.gov.in या संकेतस्थळावर जाऊन माहिती घेता येते किंवा National Toll Free Number 1800-180-1111/ 1800-110-001 या नंबर वरती संपर्क साधता येते.

**तक्ता – 2PMJJBY and PMSBY अंतर्गत राज्य निहाय नावनोंदणी आणि दाव्यांची माहिती**

| Annexure as referred to in part (a) of reply to Lok Sabha Q. No. 3618 for 20.12.2021 | | | | Annexure as referred to in part (b) of reply to Lok Sabha PQ. No. 3618 for 20.12.2021 | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| State-wise, Scheme-wise Distribution of Cumulative Enrolments as on 27.10.2021 | | | | State-wise, Scheme-wise Distribution of PMJJBY and PMSBY Claims -as on 27.10.2021 | | | |
| Sl. No. | State/UTs | PMJJBY | PMSBY | PMJJBY | | PMSBY | |
| | | Enrolments | Enrolments | No. of Claims Paid | Claims Amount Paid (in Rs. Crore) | No. of Claims Paid | Claims Amount Paid (in Rs. Crore) |
| 1 | Andaman and Nicobar Islands | 29,155 | 70,490 | 79 | 1.58 | 5 | 0.10 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | Andhra Pradesh | 65,40,146 | 1,58,11,529 | 2,03,640 | 4,072.80 | 21,613 | 428.64 |
| 3 | Arunachal Pradesh | 76,766 | 1,47,830 | 233 | 4.66 | 3 | 0.06 |
| 4 | Assam | 16,91,426 | 52,23,344 | 6,922 | 138.44 | 747 | 13.81 |
| 5 | Bihar | 42,85,468 | 1,39,69,196 | 12,479 | 249.58 | 1,181 | 22.82 |
| 6 | Chandigarh | 72,277 | 2,47,430 | 371 | 7.42 | 1,546 | 29.22 |
| 7 | Chhattisgarh | 24,09,761 | 78,17,397 | 15,493 | 309.86 | 2,136 | 41.47 |
| 8 | Dadra & Nagar Haveli and Daman & Diu | 78,113 | 1,40,561 | 186 | 3.72 | 6 | 0.12 |
| 9 | Goa | 1,57,499 | 3,70,952 | 641 | 12.82 | 87 | 1.73 |
| 10 | Gujarat | 40,57,002 | 99,42,966 | 31,417 | 628.34 | 3,867 | 72.74 |
| 11 | Haryana | 19,42,521 | 51,93,324 | 9,351 | 187.02 | 2,136 | 42.01 |
| 12 | Himachal Pradesh | 4,40,777 | 15,97,785 | 2,285 | 45.70 | 695 | 13.47 |
| 13 | Jammu and Kashmir | 4,10,069 | 10,08,899 | 1,279 | 25.58 | 102 | 2.01 |
| 14 | Jharkhand | 18,86,299 | 58,90,405 | 4,042 | 80.84 | 756 | 14.99 |
| 15 | Karnataka | 47,10,766 | 1,05,37,632 | 34,714 | 694.28 | 7,339 | 141.85 |
| 16 | Kerala | 11,11,836 | 56,83,760 | 3,315 | 66.30 | 1,517 | 29.93 |
| 17 | Lakshadweep | 2,357 | 7,581 | 1 | 0.02 | 0 | 0.00 |
| 18 | Madhya Pradesh | 50,67,140 | 1,64,54,942 | 22,709 | 454.18 | 7,253 | 141.55 |
| 19 | Maharashtra | 69,17,286 | 1,74,96,774 | 29,446 | 588.92 | 9,637 | 187.76 |
| 20 | Manipur | 68,048 | 2,09,053 | 393 | 7.86 | 15 | 0.30 |
| 21 | Meghalaya | 1,31,873 | 3,17,135 | 344 | 6.88 | 12 | 0.23 |
| 22 | Mizoram | 1,21,450 | 2,07,730 | 953 | 19.06 | 23 | 0.44 |
| 23 | Nagaland | 74,057 | 2,12,944 | 153 | 3.06 | 0 | 0.00 |
| 24 | Delhi | 12,65,706 | 35,57,440 | 8,457 | 169.14 | 1,312 | 24.67 |
| 25 | Odisha | 31,45,850 | 89,84,859 | 11,093 | 221.86 | 1,853 | 36.33 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 26 | Puducherry | 91,532 | 2,42,315 | 504 | 10.08 | 84 | 1.67 |
| 27 | Punjab | 18,61,298 | 62,43,262 | 4,637 | 92.74 | 1,500 | 28.96 |
| 28 | Rajasthan | 42,27,061 | 1,26,43,411 | 20,381 | 407.62 | 4,484 | 83.13 |
| 29 | Sikkim | 56,783 | 1,24,768 | 130 | 2.60 | 9 | 0.18 |
| 30 | Tamil Nadu | 40,58,715 | 1,15,69,218 | 14,356 | 287.12 | 5,072 | 99.56 |
| 31 | Telangana | 37,98,510 | 93,67,618 | 20,517 | 410.34 | 5,476 | 109.11 |
| 32 | Tripura | 2,29,925 | 7,94,422 | 805 | 16.10 | 86 | 1.60 |
| 33 | Uttar Pradesh | 85,70,908 | 3,28,05,228 | 38,444 | 768.88 | 6,530 | 126.95 |
| 34 | Uttarakhand | 5,87,525 | 25,87,072 | 3,120 | 62.40 | 2,075 | 39.40 |
| 35 | West Bengal | 42,96,384 | 1,49,77,930 | 10,025 | 200.50 | 3,109 | 60.29 |
| 36 | Ladakh | 8,674 | 18,161 | 0 | 0.00 | 0 | 0.00 |
| 37 | Others & Non-CBS Enrolments* | 3,84,56,132 | 3,59,16,806 | | | | |
| **Grand Total** | | **11,29,37,095** | **25,83,92,169** | **5,12,915** | **10,258.30** | **92,266** | **1,797.09** |
| **Source - pib.gov.in 2021-22** | | | | | | | |

**प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना (PMSBY)-**

(1.06.2022 पासून 20 रुपये) 20 रुपयाचा विमा (पूर्वी १२ रुपये) म्हणून हा विमा ओळखला जातो.प्रधानमंत्री सुरक्षा विमायोजना केंद्र सरकारने ९ मे २०१५ रोजी चालू केली असून हा एक अपघात विमा (Accident Insurance) आहे.अपघात झाल्यानंतर या विम्याचा लाभ आपल्याला घेता येतो. अपघातामध्ये मृत्यू झाला तर किंवा पूर्णतः अपंगत्व आल्यास २ लाख रुपये आणि अशंतः अपंगत्व आल्यास १ लाख रुपये विम्याचे कवच मिळू शकते.

**पात्रता-**

- ज्या व्यक्तीला PMSBY चा लाभ घ्यायचा असेल त्याचे कोणत्याही एका बँकेत खाते असावे लागते.
- विमाधारकाचे वय १८ वर्षे ते ७० वर्षापर्यंत असावे .
- सदरबँकेच्या खात्याला आधार नंबर लिंक (Aadhar Link) असावा लागतो.

**अर्ज –**

ज्यांना प्रधानमंत्री सुरक्षा विमायोजनेचा लाभ घ्यायचा असेल त्यांनी PMSBY अर्ज भरून त्यांचे ज्या बँकेत खाते आहे त्या बँकेच्या शाखेत जाऊन अर्ज करावा लागतो. सदर विम्याचा अर्ज (PMSBY Form) https://jansuraksha.gov.in/Forms-PMSBY.aspxया संकेतस्थळावर जाउन डाऊनलोड करून घेता येतो. काही बँकांच्या इंटरनेट बँकिंग किंवा Mobile Banking वरून सुद्धा ह्या सेवेचा ऑनलाईन अर्ज करून लाभ घेता येतो.

**हफ्ता (Premium) -**

सदर योजनेसाठी वार्षिक हफ्ता हा 20 रुपये असून अर्ज केल्यानंतर तो आपल्या खात्यातून वजा केला जातो.हा हफ्ता दरवर्षी मे महिन्यामध्ये आपोआप (Auto Debit) आपल्या खात्यातून वजा केला जातो. त्यामुळे मे महिन्यामध्ये आपल्याला आपल्या खात्यामध्ये योग्य शिल्लक ठेवावी लागते. जर शिल्लक नसेल तर आपला विमा आपोआप बंद होतो.

**नुतनीकरण –**

आपल्या खात्यामधून मे महिन्यामध्ये 20 रुपये वजा झाले असतील तर आपल्या विम्याचे आपोआप नुतनीकरण केले जाईल. जर आपल्या खात्यामध्ये उपलब्ध शिल्लक (Minimum Balance For PMSBY) नसेल तर आपला विमा बंद होतो.त्यानंतर जर आपल्याला विमा संरक्षण हवे असेल तर त्यासाठी पुन्हा नवीन फॉर्म भरून द्यावा लागतो.

**लाभ –**

- सदर विमा हा अपघात विमा असून अपघातामध्ये मृत्यू झाल्यास २ लाख रुपये लाभ मिळतो .
- संपूर्ण अपंगत्व आल्यानंतर २ लाख रुपये विम्याचे संरक्षण मिळते.
- अंशतः अपंगत्व आल्यास रुपये १ लाख विमा संरक्षण मिळते.

**कालावधी-**

ह्या विम्याचा कालावधी हा एक वर्षाचा म्हणजेच १ जून ते ३१ मे असा असून दरवर्षी हा विमा आपोआप नुतनीकरण केला जातो. आपोआप नुतनीकरण होण्यासाठी आपल्या खात्यामध्ये उपलब्ध शिल्लक ठेवावी लागते. दुसऱ्या वर्षी आपल्या खात्यातून 20 रुपये आपोआप वजा केल्यानंतर हा विमा पुढील एका वर्षासाठी वाढवला जातो.

**कवर समाप्ती (Termination of Cover)**

- विमाधारकाचे वय ७० वर्षे पूर्ण झाल्यानंतर.
- बँकेतील खाते बंद केल्यानंतर.
- मे महिन्यामध्ये खात्यामध्ये उपलब्ध शिल्लक नसेल तर.
- जर एकापेक्षा जास्त बँकेमध्ये खाते असेल आणि एकापेक्षा जास्त ठिकाणी सदर विम्याचा अर्ज केला असेल तर विम्याचे संरक्षण फक्त एकाच खात्याला मिळू शकते.

**दावा –**

आपल्याला जर विम्याचा दावा करायचा असेल तर प्रधानमंत्री सुरक्षा विमा दावा फॉर्म (PMSBY Claim Form) भरून बँकेमध्ये द्यावा लागतो. त्यासाठीचा फॉर्म खालील लिंक वर क्लिक करून https://jansuraksha.gov.in/Forms-PMSBY.aspxडाऊनलोड करता येतो.

**अधिक माहिती –**

अधिक माहितीसाठी www.jansuraksha.gov.in या संकेतस्थळावर जाऊन माहिती घेता येते किंवा National Toll Free Number 1800-180-1111/ 1800-110-001 या नंबर वरती संपर्क साधता येतो.

**तक्ता क्र. 3 - PMJJBY आणि PMSBY अंतर्गत विकास (As on 15.12.2021)**

| Scheme | Eligibility (Yrs) | Premium (p.a.) | Enrollments (crores) | Claims paid | Claims amount (crores) (Rs.) | Settlement Ratio (%) |
|---|---|---|---|---|---|---|
| PMJJBY | 18 to 50 | Rs. 330 | 11.77 | 5,28,182 | 10,563.64 | 99.74% |
| PMSBY | 18 to 70 | Rs. 12 | 26.59 | 93,281 | 1,817.19 | 97.67% |

**स्रोत – DFS वार्षिक अहवाल 2021-22**

**आव्हाने -**

- PMJJBY आणि PMSBY मध्ये नावनोंदणी करण्यासाठी, बँक खातेधारकांना आरोग्य दाखला देणे आवश्यक आहे. सामान्य व्यक्ती आणि डॉक्टरांचा अंदाज भिन्न असला तर दावा निकाली काढण्यास विलंब होऊ शकतो किंवा नाकारला जाऊ शकतो.
- गेल्या 3 वर्षांपासून, बँका PMJJBY आणि PMSBY चे लक्ष्य पूर्ण करण्यासाठी सतत संभाव्य बँक खातेदारांची नावनोंदणी करत आहेत. दुर्दैवाने, बँकेचे वर्तमान ऑपरेटिंग सॉफ्टवेअर आधीच नोंदणीकृत व्यक्तीचा शोध घेण्यास अक्षम आहे. परिणामी, दुहेरी नावनोंदणी मोठ्या प्रमाणावर होत आहे.
- PMJJBY अंतर्गत, कव्हरेज वय फक्त 18-50 वर्षे आहे.
- विमाधारक व्यक्तीला कोणतीही विमा पावती किंवा प्रमाणपत्र दिले जात नाही. त्यामुळे बऱ्याच प्रकरणांमध्ये, असे होऊ शकते की अपघातानंतर, मृत व्यक्तीच्या कुटुंबातील सदस्यांना विम्याबद्दल माहिती नसावी.
- विमा कंपनीच्या दृष्टिकोनातून, दर्जेदार सेवा देण्यासाठी प्रीमियमची रक्कम खूपच कमी आहे. परिणामी खाजगी विमा कंपन्या पुढे येत नाहीत.
- दोन्ही विमा योजनेत विमासंरक्षण रक्कम फक्त रु. 2 लाख आहे. या कव्हरेजचा देशातील उच्च उत्पन्न गटातील लोकांवर प्रभाव पडत नाही.
- आजही समाजातील एक मोठा वर्ग विमा हे एक साधन मानतो, ज्याचा वापर वयाच्या 45-50 वर्षांनंतर करतो.

**उपाय -**

- पोस्ट-ऑफिस आणि एनजीओंना देशाच्या ग्रामीण आणि निम-शहरी भागांना कव्हर करण्यासाठी पुढे येण्यासाठी आमंत्रित करणे.
- विम्याची घनता आणि प्रवेश वाढवण्यासाठी, नवीन खाते उघडण्यासाठी PMJJBY आणि PMSBY अनिवार्य करणे आवश्यक आहे.
- बँकर्सच्या विद्यमान प्रयत्नांची आर्थिक प्रोत्साहनांसह प्रशंसा केली पाहिजे आणि भविष्यातील प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रेरित केले पाहिजे.
- विमा कंपन्यांनी संभाव्य ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी विमा पॉलिसीसह अतिरिक्त लाभ मिळवण्याचा प्रयत्न केला पाहिजे.
- विम्याचे महत्त्व लक्षात घेऊन, आर्थिक आणि आर्थिक साक्षरता वाढविण्यासाठी तो शाळा आणि महाविद्यालयांसाठी एक विषय असावा.

- ❖ खाजगी क्षेत्रातील बँका आणि विमा कंपन्यांना PMJJBY आणि PMSBY मध्ये सहभागी होण्यासाठी आमंत्रित करणे.
- ❖ आयकर लाभ सुलभ करण्यासाठी सरकारने उच्च आणि मध्यम उत्पन्न गटांना आकर्षित करण्यासाठी अतिरिक्त-लाभ वाढवावे.

**निष्कर्ष:**

भारताच्या वर्तमान केंद्र सरकारने विम्याची अत्यावश्यक भूमिका लक्षात घेतली आणि प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना आणि प्रधान मंत्री सुरक्षा विमा योजना या मुदतीच्या विमा योजना, अनावृत लोकांना कव्हर करण्याच्या, सेवा न मिळालेल्यांची सेवा करण्याच्या आणि समाजातील अशक्त वर्गाला आशीर्वाद देण्याच्या दृष्टीकोनातूनसुरु केल्या. "जन धन से जन सुरक्षा" - आर्थिक समावेशाद्वारे सामाजिक समावेशन हे या उपक्रमाचे उद्दिष्ट आहे. सरकारने सार्वजनिक विमा कंपन्या, खाजगी विमा कंपन्या आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे समाजातील गरीब आणि वंचित घटकांना अतिशय किफायतशीर आणि प्रभावी संरचनेत समाविष्ट करण्यासाठी निरोगी हात जोडले आहेत. अशा प्रकारे, या उपक्रमांद्वारे सरकार “न्यू इंडिया- स्वस्थ से समृद्धी” च्या स्वप्नाकडे वाटचाल करत आहे.

**संदर्भ -**

1. Sarathe O.P. and Sharma Vipin (2017) “Analytical View on Pradhan Mantri Jeevan Jyoti BimaYojna”, Journal of Management Engineering & Information Technology
2. IRDAI Annual Report 2020-21
3. https://static.pib.gov.in/WriteReadData/specificdocs/documents/2021/dec/doc2021122010.pdf
4. https://economictimes.indiatimes.com/wealth/insure/govt-hikes-insurance-premiums-under-pm-jeevan-jyoti-bima-yojana-suraksha-bima-yojana-w-e-f-june-1/articleshow/91932214.cms
5. https://www.tv9marathi.com/business/now-life-insurance-companies-will-be-allowed-to-sell-health-insurance-health-insurance-will-be-cheaper-au127-762138.html
6. https://pib.gov.in/PressReleaseIframePage.aspx?PRID=1783535